

कुलगुरु कै. वि. गं. तथा
दादासाहेब केतकर



धनुर्धारी श्रीराम लक्ष्मण

विद्वान् सर्वत्र पूज्यते।
स्थापना १२ मे १९०९



शिक्षणमहर्षी कै. डॉ. ग. श्री.
तथा अण्णासाहेब खैर


पुणे विद्यार्थी गृहाचे मासिक

# समाचार

**Pune Vidyarthi Griha's 'Samachar' Magazine July 2022 - Pages - 36**

संपादक : श्री. सुनील पांडुरंग रेडेकर | कार्यकारी संपादक : श्री. सुभाष मल्लाप्पा जिर्गे

* पुणे * वर्ष ७३ * अंक ९ * किंमत रु. १०/- * वार्षिक वर्गणी रु. १००/-








संस्थेच्या नाशिक, पंचवटी शाखेमध्ये दि. ३० मे २०२२ (वैशाख अमावास्या) रोजी श्री केशव महाराज पुण्यतिथीनिमित्त रूद्र अभिषेक करताना कार्याध्यक्ष श्री. सुनील रेडेकर व सौ. वर्षा रेडेकर.
पूजा करताना कार्याध्यक्ष श्री. सुनील रेडेकर व सौ. वर्षा रेडेकर व संचालक श्री. अमोल जोशी व सौ. शुभांगी जोशी.

## ✻ नेरुळ शाखा, नवी मुंबई २१वा वर्धापन दिन - १८ जून २०२२ ✻



१८ जून २०२२ रोजी पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरुळ शाखेच्या २१व्या वर्धापनदिनानिमित्त सत्यनारायण पूजा करताना कार्याध्यक्ष श्री. सुनील रेडेकर व सौ. वर्षा रेडेकर



१८ जून २०२२ रोजी पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरुळ शाखेच्या २१व्या वर्धापनदिन सोहळ्याचे उद्घाटन प्रसंगी दिपप्रज्वलन करताना कार्याध्यक्ष श्री. सुनील रेडेकर, सोबत माजी कार्याध्यक्ष प्रा. कृ. ना. शिरकांडे व इतर मान्यवर मंडळी



१८ जून २०२२ रोजी पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरुळ शाखेच्या २१व्या वर्धापनदिनी कार्याध्यक्ष श्री. सुनील रेडेकर,सौ. वर्षा रेडेकर, सोबत माजी कार्याध्यक्ष प्रा. कृ. ना. शिरकांडे, संचालक श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, संचालक श्री. दिनेश मिसाळ, शाळेतील शिक्षक व कर्मचारी



१८ जून २०२२ रोजी पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरुळ शाखेच्या २१व्या वर्धापनदिनी कार्यक्रमात सहभागी झालेले - सौ. वर्षा रेडेकर, मुख्याध्यापिका सौ. सुवर्णा मिसाळ, शिक्षक, पालक व विद्यार्थी

संपादकीय

# स्वयंशिस्त

रोजच्या दैनंदिन जीवनामध्ये जो तो आपापल्या परीने व्यवसाय व नोकरी करीत असताना आपला आत्मसन्मान जपत असतो. ज्यांनी आपल्याला नोकरीची, व्यवसायासाठी संधी दिली त्याप्रती निष्ठा बाळगून आपला विकास साधताना दिसून येते. काही मंडळी आपल्या स्वार्थासाठी जवळच्या निष्ठावान मंडळींच्या मनामध्ये समज-गैरसमज पसरवून मत परिवर्तन करत असतात याची उदाहरणे आपण दैनंदिन जीवनामध्ये पहात असतो.

निष्ठावान व्यक्तीही मनोमन आत्मपरीक्षण करतच असते. आपण कोण? आपला प्रवास कसा येथपर्यंत पोहोचला? त्यासाठी आपण काय केले? आपली केलेली नियुक्ती योग्य होती का? आपली त्यासाठी योग्यता होती का? हे आणि असे असंख्य प्रश्न प्रत्येकाच्या मनामध्ये घोळत असतात. आपल्याला मिळालेली संधी, त्याचा आपण कसा आणि कुणासाठी उपयोग केला किंवा करत आहोत याचेही भान रहात नाही. परंतु आपणही कोणाचेतरी भावलं होतोय का याचा विसर पडून त्या व्यक्ती वस्तुस्थिती मानायला तयार नसतात.

पुण्यामधून पंढरीच्या वारीचे प्रस्थान ठेवले गेले त्यावेळी प्रत्यक्ष वारीमध्ये वर्षानुवर्षे पायी वारी करणाऱ्या एका दिंडीशी संपर्क आला आणि वारीमध्ये असणारी शिस्त अनुभवता आली. खरंतर प्रत्येक वारकरी हा आपल्या आपल्या शिस्तीमध्ये वावरत असताना दिसतात. त्यांना कोणीही प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष शिस्तीचे प्रशिक्षण देत नसतो. रोजच्या गरजेच्या वस्तू बरोबर घेऊन मागचा पुढचा कसलाही विचार न करता केवळ माऊलीच्या प्रेमापोटी आणि माऊलीच्या भेटीसाठी आतूर होऊन ठरलेली पायपीट करणे आणि तेही लाखो वारकऱ्यांच्या समवेत प्रत्येकाला मदतीचा हात पुढे करीत, लहान-थोर, गरीब-श्रीमंत हा भेदभाव न मानता चालत रहाणे हेच अनुभवायला येते. त्यातुनच समुह जीवन, स्वतःची कामे स्वतः करणे अशा एक ना अनेक गोष्टीतून बरेच आदर्श वारीतून शिकता येतात.

जीवनात वाटचाल करताना शिस्त नसेल तर ते जीवन बेढब होते. त्याला आकार राहत नाही. त्यामुळे नवीन समस्या निर्माण होतात. आपला चेहरा हसरा ठेवला तर समोरच्या संकटावर मात करण्याची शक्ती निर्माण होते. जीवन यशस्वी करायचे असेल तर आयुष्यात शिस्तीची गरज आहे.

आयुष्याची जीवनात वाटचाल करताना अनेक संकटे येतात. ही संकटे एक संधी आहे असे समजून त्यावर मात केली तर नक्कीच यशस्वी जीवनाचे टप्पे पुढे दिसू लागतात. हेच टप्पे हळू हळू व्यक्तीला यशाच्या शिखराकडे घेऊन जातात. विचार ही शक्ती आहे. तिला चालना द्या. विचार प्रत्यक्षात उतरवण्यासाठी मेहनत घेतली तर यश आपोआप पदरात पडते. हे सर्व मिळविण्यासाठी मातृभाषा आणि श्लोकांचे महत्व खूप आहे. ते आत्मसात केले पाहिजे.

मुले ही समाजाचा मुख्य घटक आहेत. या मुलांवर योग्य वयात योग्य संस्कार केले तर एक आदर्श तरुण त्यामधून घडतो. हेच तरुण उद्याचा यशस्वी भारत घडवणार आहेत. त्यामुळे पालकांनी सकारात्मक विचार, संस्कार मुलांवर केले पाहिजेत. चांगले विचार, संस्कार, सकारात्मक विचार माणसाला ऊर्जा देतात. आरोग्य चांगले ठेवतात. राग, चिडचिड या गोष्टी निघून जातात. समोर येणारा प्रत्येक माणूस हा गुरु आहे असे समजून वर्तन असावे. लहानमोठा असा भेदभाव त्यामध्ये करू नये. त्यामधून जीवनाचे तत्वज्ञान अभ्यासायला मिळते. या सर्व गोष्टी स्वयंशिस्तीमुळे सुखकर होतात.

दि. २१ जून २०२२
पालखी प्रस्थान - आळंदी

## प्रार्थनेचे मनन

आश्रमात असताना आपण ''प्रार्थना'' करीत होतो. आता विसरून गेलो, पण पाठांतर कायम असेल. एकदा मनाशी गुणगुणा, तिच्यातील अर्थावर मनन करा. काय वाटते? आजही प्रत्येक वाक्याला अर्थ आहे. किंबहुना आजच त्या विचारांची जरुरी आहे. विचाराप्रमाणे वागण्याची जरुरी आहे.

सदा सुसंगती घडावी. सुजनवाक्य सदा कानी पडावे. सज्जनांनी दाखविलेल्या मार्गांनी मनाने जावे. थोडक्यात म्हणजे आपल्या भोवतालचे मित्रांचे, विचारांचे आणि आचारांचे वातावरण चांगले असावे. शुद्ध, निर्मळ, पवित्र, सात्त्विक, उदात्त असावे.

मतीचा कलंक झडो. विषय सर्वथा नावडो. मनातील दुष्ट, तामसी विचार नाहीसे कर. केवळ सुखासक्त बनू नको. विषयवासनेवर नियंत्रण घाल. आपला समाज दिवसेंदिवस सुखलोलुप आणि भोगवादी बनत चालला आहे. विकासापेक्षा विलासाकडे झुकता कल आहे. म्हणून ही प्रार्थना.

न निश्चय कधी ढळो. मनाशी केलेले संकल्प सिद्धीस नेण्याइतके आत्मसामर्थ्य मला मिळो. दुरभिमान सारा गळो. खोटा अभिमान नाहीसा होवो. अधिकार, संपत्ती, पदव्या आणि कर्तबगारी यांच्याबद्दल गर्व न वाटो. विनयाने सद्‌गुण शोभतात. स्वतत्त्व हृदया कळो. आयुष्य कशाकरिता आहे? संसार आणि सुख यापलीकडेही मला कर्तव्ये आहेत. ऋणे आहेत. जीवनध्येयाविषयी वारंवार विचार होवो. असे अमोल विचार सुसंगतीत होते. अजून आहेत. बालपणी प्रार्थना सक्तीने होते. आता स्वेच्छेने करा. विचारांना रोज उजाळा द्या. फायदा होईल. शांती मिळेल.

**डॉ. ग. श्री. खैर (नोव्हेंबर १९५१)**

---

### * निवेदन *

यापुढे परदेशात समाचारचा अंक पाठविण्यासाठी पोस्टाच्या नवीन दरपत्रकाप्रमाणे प्रत्येक अंकासाठी ३३ रु. वाढ झालेली आहे. म्हणजे एकूण दरमहा १०० रु. पोस्टेज लावावे लागेल याची कृपया नोंद घ्यावी. तरी पुढील महिन्यापासून पोस्टाने अंक पाठविणे परवडणारे नाही. आपले इ-मेल आयडी पाठविल्यास आपणास इ-समाचार पाठविणे सोपे जाईल. यापूर्वीही आम्ही आपणास आवाहन केलेले होते. कळावे.

- संपादक

# महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे

**कार्यवाह : प्रा. राजेंद्र सं. कांबळे**
**प्राचार्य : श्री. व्ही. पी. गावडे**

## इ. १२ वी बोर्ड परीक्षेत नेत्रदिपक यश

एच. एस. सी. बोर्ड फेब्रुवारी मार्च २०२२ मध्ये सायन्स विभागाने नेत्रदिपक यश संपादन केले. विद्यालयाचे हे शताब्दी वर्ष आहे. शताब्दी वर्षामध्ये विद्यालयाचा निकाल १००% लागला आहे. विद्यालयाने उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे.

विद्यार्थी कु. अनुराग मांडके ८९.८३% गुण प्रथम, कु. अथर्व खडलोया ८८.६७% द्वितीय व कु. शिव मोरे ८७.१७% तृतीय क्रमांकमिळविला. कु. भार्गव थार व कु. योहान पाठक या विद्यार्थ्यांनी मेकॅनिकल मेंटेनन्स या विषयामध्ये २०० पैकी २०० गुण मिळवून विशेष यश संपादन केले.

संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. सुनील रेडेकर, कार्यवाह प्रा. राजेंद्र कांबळे, सर्व पदाधिकारी आणि प्राचार्य श्री. व्ही. पी. गावडे यांनी शिक्षक व सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन व कौतुक केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## गुरुवर्य कै. आण्णासाहेब खैर जयंती संपन्न

सन २०२२-२३ या शाळेच्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात व पुणे विद्यार्थी गृहाचे माजी कार्याध्यक्ष व महाराष्ट्र विद्यालयाचे संस्थापक गुरुवर्य कै. ग. श्री. तथा आण्णासाहेब खैर यांची जयंती बुधवार दि. १५-६-२०२२ रोजी उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे पुणे विद्यार्थी गृहाचे कार्यवाह प्रा. राजेंद्र कांबळे हे होते. तसेच या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रशालेचे प्राचार्य श्री. वि. पां. गावडे हे होते.

या कार्यक्रमाचा आरंभ गुरुवर्य कै. ग. श्री. तथा आण्णासाहेब खैर यांच्या प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आला. प्रतिमेचे पूजन कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे कार्यवाह प्रा. राजेंद्र कांबळे यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून केले.या प्रसंगी प्रशालेचे अध्यापक श्री. ज्ञानेश्वर दाते यांनी गुरुवर्य कै. ग. श्री. तथा आण्णासाहेब खैर यांच्या कार्याची माहिती विद्यार्थ्यांना सांगितली. संस्थेचे कार्यवाह प्रा. राजेंद्र कांबळे यांनीही गुरुवर्य कै. ग. श्री. तथा आण्णासाहेब खैर यांच्या कार्याबाबत मनोगत व्यक्त करून प्रशालेतील विद्यार्थ्यांचे स्वागत केले. या प्रसंगी प्रशालेतील इ. ५वी ते ८वी च्या विद्यार्थ्यांना संस्थेचे कार्यवाह प्रा. राजेंद्र कांबळे, प्रशालेचे प्राचार्य श्री. वि. पां. गावडे आणि प्रशालेचील इतर सर्व शिक्षकांच्या हस्ते मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाची प्रस्तावना प्रशालेचे अध्यापक श्री. ज्ञानेश्वर दाते यांनी केली.

## मोफत वह्या वाटप

माजी विद्यार्थी मंडळातर्फे शनिवार दि. १८-६-२०२२ रोजी इ. ८वी ते १०वीचे विद्यार्थी आणि शनिवार दि. २५-६-२०२२ रोजी इ. ५वी ते ७वीचे प्रशालेतील विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचे वाटप करण्यात आले. या प्रसंगी संस्थेचे उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, संस्थेचे संचालक तसेच श्री. कृष्णाजी कुलकर्णी आणि प्राचार्य वि. पा. गावडे हेही उपस्थित होते. याप्रसंगी श्री. कृष्णाजी कुलकर्णी यांनी मनोगत व्यक्त केले आणि विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. तसेच प्रशालेचे प्राचार्य वि. पां. गावडे यांनीही मनोगत व्यक्त केले. तसेच मोफत वह्यांचे वाटप करणाऱ्या एका माजी विद्यार्थ्याने कविता सादर करून मनोगत व्यक्त केले. यानंतर श्री. कृष्णाजी कुलकर्णी, श्री. एस. एम. जिर्गे, प्राचार्य वि. पां. गावडे तसेच प्रशालेतील सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांच्या हस्ते प्रशालेतील विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रशालेचे प्राचार्य वि. पां. गावडे यांनी केले. सूत्रसंचालन अध्यापक श्री. ज्ञानेश्वर दाते यांनी केले. कार्यक्रमाची सांगता अध्यापिका सौ. प्राजक्ता चोपडे यांनी केलेल्या आभारप्रदर्शनाने झाली. ***

## विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर, मुंबई शाखा

**संचालक : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**संचालक : श्री. दिनेश पि. मिसाळ**

## विद्याभवन माध्यमिक मराठी व ज्यु. कॉलेज, विद्याभवन हायस्कूल नं. २,

**मुख्याध्यापिका : श्रीमती योगिनी रा. पोतदार (मराठी माध्यम)**

**मुख्याध्यापक : श्री. सुनिल पाटील (इंग्रजी माध्यम)**

**प्रवेशोत्सव :**

दि. १५ जून २०२२ रोजी शासन निर्णयानुसार इ.५वी ते १०वी चे वर्ग सुरु करण्यात आले. सकाळी ७.३० वाजता सर्व विद्यार्थी कोरोनाबाबतच्या सुरक्षा नियमांचे पालन करून शाळेच्या आवारात उपस्थितहोते. या निमित्त सकाळ वृत्तपत्रसमूहातर्फे विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी प्रवेशोत्सव आयोजित करण्यात आला.या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून सत्कर्म फांउ्डेशनचे संचालक श्री. अनुज नरूला व श्री. दत्तात्रय सावंत तसेच संस्थेचे संचालक श्री. राजेंद्र बो-हाडे, मुख्याध्यापिका सौ. योगिनी पोतदार, सकाळ चे प्रतिनिधी श्री. जालिंदर शेटे आणि सर्व शिक्षक उपस्थित होते. सौ. योगिनी पोतदार यांनी प्रमुख पाहुणे व सर्व विद्यार्थ्यांचे स्वागत करून विद्यार्थ्यांना कोरोनाबाबतच्या नियमांचे पालन करण्यास सांगितले. संस्थेचे संचालक श्री. राजेंद्र बो-हाडे यांनी सर्व विद्यार्थी शाळेत उपस्थित राहिल्याबद्दल आनंद व्यक्त करून विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा दिल्या.यावेळी सर्व विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुणे व मान्यवरांच्या हस्ते गुलाबपुष्प, मास्क व सकाळ वर्तमानपत्र देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांना सर्वशिक्षा अभियानांतर्गत शालेय पाठयपुस्तके वितरित करण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांच्या शाळेतील प्रथम दिवसा निमित्त उपस्थित मान्यवर जादूगर श्री. पी.ए.कामत यांनी विद्यार्थ्यांना विविध जादूचे प्रयोग दाखवून त्यांचे मनोरंजन केले.

**गुरूवर्य अण्णासाहेब खैर जयंती :**

दि. १५ जून २०२२ रोजी विद्याभवन प्रशालेत गुरूवर्य अण्णासाहेब खैर यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास संस्थेचे संचालक श्री. राजेंद्र बो-हाडे, माजी विद्यार्थी मंडळाचे सचिव श्री. तुकाराम दौंडकर, जादूगार श्री. पी.ए.कामत, सकाळचे प्रतिनिधी श्री. जालिंदर शेटे, माध्यमिक मराठी विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. योगिनी पोतदार, माध्यमिक इंग्रजी विभागाचे मुख्याध्यापक श्री. सुनिल पाटील, समन्वयक सौ. सरला नरेंद्रन, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते अण्णांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. या प्रसंगी श्री. राजेंद्र बो-हाडे यांनी संस्थेचे दोन तपस्वी यांचेबाबत सांगून अण्णांच्या कार्याचा आढावा घेतला. तसेच विद्यार्थ्यांनी अण्णांच्या कार्यातून प्रेरणा घ्यावी असे सांगितले.

यावेळी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या संकल्पनेतून मुंबई पोलीस विभागातर्फे दि. ३० मे २०२२ रोजी युथ फॉर मुंबई स्पीकर फोरम या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये सहभागी १३० शाळांमधील विद्यार्थ्यांमधून विद्याभवन हायस्कूलची विद्यार्थीनी कु. कोमल तुषार तोत्रे हिला प्रथम क्रमांकाचे वैयक्तिक विभागातील पारितोषिक मिळाले, त्याबद्दल उपस्थित मान्यवरांच्या हस्ते तिला गौरविण्यात आले.





कु. कोमल तुषार तोत्रे व कु. वेदांत दीक्षित पारितोषिक स्वीकारताना.



मा. श्री. बाळासाहेब ठाकरे बृहन्मुंबई आदर्श शिक्षिका पुरस्कार २०२२ पुणे विद्यार्थी गृहाचे विद्याभवन हायस्कूल माध्यमिक मराठी च्या सहा. शिक्षिका श्रीमती मीनल जगन्नाथ भोळे पुरस्कार स्वीकारताना, सोबत नगर सेविका सौ. संध्या विपूल जोशी व इतर मान्यवर



दि. १५ जून २०२२ रोजी सर्व शिक्षा अभियान अंतर्गत मुलांना मोफत पुस्तके वाटप करताना संचालक श्री. राजेंद्र बोऱ्हाडे सर, मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार व इतर मान्यवर

**उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा २०२२ विज्ञानशाखा निकाल :**

शै. वर्ष २०२१-२२ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी २०२२ विद्याभवन कनिष्ठ महाविद्यालय विज्ञान शाखेतून एकूण १९८ विद्यार्थी प्रविष्टझाले. त्यापैकी १९५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.०१ विद्यार्थीनीने विशेष प्राविण्य मिळविले. तर ४८ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी मिळविली. विज्ञानशाखेचा एकूण निकाल ९८.४८ % लागला.

गुणानुक्रमे पहिले तीन विद्यार्थी पुढीलप्रमाणे :

१ थोरात सोहा आनंद ७५.५०% ४५३/६००
२ शेख अरबीया मा.अबुसालीम ७३.५०% ४४१/६००
३ राजगुरु स्नेहा परशुराम ७१.५०% ४२९/६००

**विज्ञान विनाअनुदानित शाळा (द्विलक्षी अ.क्र.)**

शै. वर्ष २०२२ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्रपरीक्षा विज्ञान विनाअनुदानित शाळेतून एकूण विद्यार्थी ४१ प्रविष्ठ झाले. ०२ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळविले तर २२ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी मिळविली. विज्ञान विनाअनुदानित शाखेचा एकूण निकाल१००% लागला.

गुणानुक्रमे पहिले तीन विद्यार्थी पुढीलप्रमाणे :

१ गायकवाड जय गंगाधर ५४६/६०० ९१.००%
२ पवार सार्थक दिलीप ४५५/६०० ७५.८३%
३ माने अथर्व शशिकांत ४३४/६०० ७२.३३ %

**उच्च माध्यमिक प्रमाणपत्रपरीक्षा निकाल २०२२ : विद्याभवन वाणिज्य शाखा**

शैक्षणिक वर्ष २०२२ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र फेब्रुवारी २०२२ घेण्यात आलेल्या परीक्षेत वाणिज्य ( स्वयं अर्थसहाय्यीत शाखेतून एकूण ७८विदयार्थी प्रविष्टझाले. त्यापैकी ७८ विदयार्थी उत्तीर्ण झाले.०६ विदयार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळविले. तर ४१ प्रथम श्रेणी तर द्वितीय श्रेणी ३१ विदयार्थ्यांनी प्राप्त केली. वाणिज्य शाखेचा निकाल१००% लागला.

गुणानुक्रमे पहिले तीन विद्यार्थीपुढीलप्रमाणे

१ वस्ता सिध्दी शिवानंद ५१३/६०० ८५.५०%
२ हुंबरकर अथर्व संजय ४९३/६०० ८२.१७%
३ शिंदे जान्हवी अभिमन्यू ४९१/६०० ८१.८३%

सर्व विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणा-या शिक्षकांचे हार्दिक अभिनंदन !

**विद्याभवन हायस्कूल व माध्यमिक मराठी एस.एस.सी एप्रिल २०२२निकाल :**

मार्च २०२२ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल १०० % लागला.या परीक्षेत एकूण १६४ विदयार्थी बसले होते. ३० विदयार्थ्यांनी ९०% पेक्षा अधिक गुण मिळविले. ९५ विदयार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळविले. ३३प्रथम श्रेणी तर द्वितीय श्रेणी ०६ विदयार्थ्यांनी प्राप्त केली.

गुणानुक्रमे पहिले तीन विद्यार्थी खालीलप्रमाणे -

१ हांडे श्रेया संदिप ९६.८०% ४८४/५००
२ जाधव दिवेश दिपक ९६.००% ४८०/५००
देवकर तनुजा रंगनाथ ९६.००% ४८०/५००
३ बोबले नंदकुमार महादेव ९५.८०% ४७९/५००
पुजारी अक्षता गणपत ९५.८०% ४७९/५००

९० च्या पुढील - ३०, विशेष योग्यता - ९५, प्रथम श्रेणी - ३३, द्वितीय श्रेणी - ०६, एकूण - १६४

**विद्याभवन हायस्कूल नं. २ (इंग्रजी माध्यम) एस.एस.सी एप्रिल २०२२ निकाल :**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ मार्फत आयोजित एप्रिल २०२२ माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षेत विद्याभवन हायस्कूल नं. २ इंग्रजी माध्यमातून एकूण २२२ विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते. या वर्षीही निकालाची१००% ची परंपरा कायम ठेवली आहे. एकूण निकालात विशेष योग्यता श्रेणी ११८ व प्रथम श्रेणी ८६ द्वितीय श्रेणी २१ विदयार्थ्यांनी प्राप्त केली.

गुणानुक्रमे पहिले तीन विद्यार्थी खालीलप्रमाणे -

१ भक्ती दिपक कु-हाडे ९८.२०% ४९१/५००
२ विजेता अरविंद रिता ९८% ४९०/५००
भूमी कमलाकर देसाई ९८% ४९०/५००
३ कृष्णा अरूण लंके ९७.२०% ४८६/५००

९० च्या पुढील - २२, विशेष योग्यता - ९६, प्रथम श्रेणी - ८३, द्वितीय श्रेणी - २१, एकूण - २२२

**विद्याभवन हायस्कूल नं. २ (मराठी माध्यम) एस.एस.सी एप्रिल २०२२ निकाल :**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ मार्फत आयोजित एप्रिल २०२२ माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षेत विद्याभवन हायस्कूल नं. २ मराठी माध्यमांतून एकूण ४४ विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते. या वर्षीही निकालाची १००% ची परंपरा कायम ठेवली आहे. एकूण निकाल प्रथम श्रेणी ०६ विदयार्थ्यांनी प्राप्त केली.

गुणानुक्रमे पहिले तीन विद्यार्थी खालील प्रमाणे -

१ निखिल संदीप देवाडकर ८५.२०%
२ रूचिता शरद अढळराव ८२.६०%
३ प्रतिभा राजेश केवाट ७८.२०%

विशेष योग्यता - ६, प्रथम श्रेणी - २७, द्वितीय श्रेणी - १०, पास - १, एकूण - ४१

**एस.एस.सी मार्च २०२२ परीक्षेत प्रथम आलेले विद्यार्थी**



कु. हांडे श्रेया संदिप
(४८४/५००) ९६.८०%
(विद्याभवन माध्यमिक मराठी)



कु. कुऱ्हाडे भक्ती दिपक
(४९१/५००) ९८.२०%
विद्याभवन नं. २ (इंग्रजी माध्यम)



कु. देवाडकर निखिल संदिप
(४२६/५००) ८५.२०%
विद्याभवन नं. २ (मराठी माध्यम)

**विद्याभवन कनिष्ठ महाविद्यालय एच.एस.सी मार्च २०२२ परीक्षेत प्रथम आलेले विद्यार्थी**



कु. वस्ता सिध्दी शिवानंद
(५१३/६००) ८५.५०%
(वाणिज्य शाखा)



कु. गायकवाड जय गंगाधर
(५४६/६००) ९१.००%
(विज्ञान शाखा - द्विलक्षी)



कु. थोरात सोहा आनंद
(४५६/६००) ७५.५०%
(विज्ञान शाखा)

## विद्याभवन प्राथमिक मराठी व इंग्रजी शाळा,

**मुख्याध्यापक :**
**श्री. गणेश कणसे (मराठी माध्यम)**
**मुख्याध्यापिका :**
**श्रीमती शुभांगी जाधव (इंग्रजी माध्यम)**

**प्रवेशोत्सव :**

विद्याभवन प्राथमिक मराठी व इंग्रजी शाळेच्या प्रथम दिवशी दिनांक १५ जून २०२२ रोजी सकाळ समूहामार्फत विद्यार्थ्यांचा शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रम साजरा केला.



**विद्यार्थी प्रवेशोत्सव साजरा करताना संस्थेचे माजी कार्याध्यक्ष श्री. के. एन. शिरकांडे, संचालक श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, यांचे सोबत घाटकोपर वृत्तपत्र विक्रेता सेनेचे अध्यक्ष श्री. प्रकाश वाणी, उपाध्यक्ष श्री. सचिन भोंगे, समाजसेवक श्री. संजय लोणकर, शिक्षक व विद्यार्थी**

सर्व विद्यार्थ्यांचे औक्षण करून विद्यार्थ्यांना सकाळ चा अंक, गुलाब, मास्क, चॉकलेट देत शालेय शिक्षकांनी व मान्यवरांनी स्वागत केले. तसेच इयत्ता ३री व ४थी च्या विद्यार्थ्यांना सकाळ वर्तमानपत्राचे वाटप ही केले. या वेळी शाळेचे माजी कार्याध्यक्ष के.एन. शिरकांडे संचालक श्री. राजेंद्र बो-हाडे, सेमी मराठी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक गणेश कणसे, प्राथमिक इंग्रजी माध्यमाच्या मुख्याध्यापिका शुभांगी जाधव, शिवसेना विधानसभा संघटक अशोक वंडेकर, घाटकोपर वृत्तपत्र विक्रेता सेनेचे अध्यक्ष प्रकाश वाणी, उपाध्यक्ष सचिन भांगे, समाजसेवक संजय लोणकर उपस्थित होते.

**अभिनंदन वार्ता :**

### १. श्रीमती मीनल जगन्नाथ भोळे - आदर्श शिक्षिका पुरस्कार शिक्षक महोत्सव २०२२

महाराष्ट्र विकासाच्या उन्नतीसाठी (शैक्षणिक/ सामाजिक/क्री डा/सांस्कृतिक) कार्य करीत असलेल्या क्षेत्रात विशेष व उल्लेखनीय कार्याचा गौरव म्हणून शनिवार दिनांक २३.०४.२०२२ रोजी मा.श्री. बाळासाहेब ठाकरे बृहन्मुंबई आदर्श शिक्षिका पुरस्कार २०२२ पुणे विद्यार्थी गृहाचे विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर, मुंबई या शाळेतील मराठी माध्यमिक विभागाच्या शिक्षिका श्रीमती मीनल जगन्नाथ भोळे यांना खासदार मा. आनंद अडसूळ, विधानसभेचे आमदार मा. श्री. प्रकाशदादा सुर्वे, संपादिका श्रीमती रोहिणी खाडिलकर व शिक्षणसमिती अध्यक्षा व नगरसेविका सौ. संध्या विपुल दोशी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

### २. युथ फॉर मुंबई स्पीक फोरम कार्यक्रम :

मा. पोलीस आयुक्त बृहन्मुंबई यांच्या संकल्पनेतून मुंबई पोलीस विभागातर्फे सोमवार, दिनांक ३० मे २०२२ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान केंद्र, नरिमन पॉईट येथे युथ फॉर मुंबई स्पीकर फोरम कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात संपूर्ण मुंबई विभागातून एकूण १३० शाळा आणि महाविद्यालयातील निवडक विद्यार्थ्यांना आदर्श मुंबई २०३० हे ध्येय पूर्ण करण्यासाठी सामान्य नागरिक / प्रशासकीय अधिकारी / राजकारणातील सक्रिय नेता या भूमिकेतून सकारात्मक योगदान कसे असायला हवे, यावर आपले विचार व्यक्त करण्याची संधी देण्यात आली होती. विशेष बाब म्हणजे संपूर्ण मुंबई विभागातून सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांमधून माध्यमिक मराठी विभागाची विद्यार्थीनी कु. कोमल तुषार तोत्रे हिला वैयक्तिक विभागातून प्रथम क्रमांकाचे तर इंग्रजी विभागाचा विद्यार्थी कु. वेदांत दीक्षित याला उत्कृष्ट सादरीकरण पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

सदर कार्यक्रमासाठी उपस्थित मुंबईचे पोलीस आयुक्त मा. संजय पांडे, सह. आयुक्त (कायदा व सुव्यवस्था) मा. विश्वास नांगरेपाटील व इतर मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांना ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

***

# माजी विद्यार्थी मंडळ, नाशिक

**अध्यक्ष : डॉ. एकनाथ कुलकर्णी**

**माजी विद्यार्थी ही शैक्षणिक संस्थांची मोठी शक्ती - माजी विद्यार्थी मेळाव्याचे अध्यक्ष प्राचार्य प्र. द. कुलकर्णी यांचे प्रतिपादन**

नाशिक दि. १९

पुणे विद्यार्थी गृह या संस्थेच्या सर्व शाखांच्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा पु.वि.गृहाच्या नाशिक येथील काळाराम मंदिराजवळच्या पंचवटी शाखेत आयोजित केला होता. या मेळाव्याचे अध्यक्ष प्राचार्य प्र. द. कुलकर्णी होते . उद्घाटन समारंभात अध्यक्षीय भाषण करताना ते म्हणाले की माजी विद्यार्थी ही शैक्षणिक संस्थांची मोठी शक्ती आहे. या शक्तीचा वापर करून शैक्षणिक संस्थांनी विकास केला पाहिजे . शाळेने केलेले संस्कार विद्यार्थी कधीही विसरत नाहीत असे सांगून त्यांनी पुणे विद्यार्थी गृहाच्या पुणे व नाशिक शाखेतील विकासाचे टप्पे व आठवणी सांगितल्या व भूतकाळ उभा केला . माजी विद्यार्थ्यांनी आपल्या मातृसंस्थेशी कायम संबंध ठेवावा असे आवाहनही त्यांनी केले. त्यांच्या तसेच डॉ. एकनाथ कुलकर्णी, म.न. ब्राम्हणकर, र. ह. निकम, अशोक धर्माधिकारी, यशवंत वाघ, जयकुमार विसपुते,अमोल जोशी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले. सुसंगती सदा घडो ही प्रार्थना प्रथम म्हणण्यात आली.मागील काही वर्षात निधन पावलेल्या माजी विद्यार्थ्यांना श्रद्धांजलीही वाहण्यात आली . या मेळाव्यात पुणे विद्यार्थी गृहाच्या नाशिक येथील वसतीगृहात १९६० ते १९७० या कालावधीत वास्तव्य केलेल्या माजी विद्यार्थ्यांची संख्या जास्त होती. सर्वांनी कृतज्ञतापूर्वक आपले संस्थेतील अनुभव सांगितले. सुमारे १०० माजी विद्यार्थी उपस्थित होते. यशवंत वाघ यांनी आयोजित केलेल्या प्रश्नमंजुषेची माहिती दिली. जयकुमार विसपुते यांनी मेळावा आयोजित करण्याचे प्रयोजन सांगितले. र.ह. निकम, देविदास पद्मे अशोक धर्माधिकारी, श्रीधर पाटणकर, सतीश मुसळे, अरुण सावंत, राम पाठक, संतोष कुलकर्णी, टी.पी. माळी, जयकुमार थोरात, रवींद्र जोशी, जगन्नाथ बोडके आदींनी आठवणी सांगितल्या. सुभाष कपाटे यांनी गीत सादर केले. सुभाष पाटील यांनी प्रेम कुणावरही करावे ही कुसुमाग्रजांची कविता सादर केली. दुपारी स्नेहभोजन झाले. त्यानंतर विद्यमान पदाधिकारी आणि संचालकांशी संवाद व त्यांचा सत्कार असा कार्यक्रम झाला. कार्याध्यक्ष श्री सुनील रेडेकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांच्यासह उपकार्याध्यक्ष श्री. सुभाष जिरगे, कुलसचिव श्री. अमोल जोशी व संचालक सर्वश्री दिनेश मिसाळ, राजेंद्र बोऱ्हाडे, संजय गुंजाळ, या संचालकांचे सत्कार करण्यात आले. प्रश्नमंजुषा स्पर्धेचे पारितोषिक वितरण संचालकांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. एकनाथ कुलकर्णी यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. विजय बाविस्कर यांनी आभारप्रदर्शन केले. सुसंगती या प्रार्थनेने मेळाव्याची सांगता झाली .




**दीप प्रज्ज्वलन करताना माजी कार्याध्यक्ष श्री. प्र. द. कुलकर्णी, सोबत सर्वश्री यशवंत वाघ, डॉ. एकनाथ कुलकर्णी, र.ह. निकम, म.न. ब्राम्हणकर, अशोक धर्माधिकारी**

***

# विद्याप्रशाला हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय

## तळेगाव अंजनेरी शाखा, नाशिक

**कुलसचिव : श्री. अमोल म. जोशी**

**मुख्याध्यापक : श्री. अशोक ना. ढिवरे**

### शाखा वर्धापन दिन

दि. १४-६-२०२२ रोजी शाखेचा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. गुरुवर्य कै. दादासाहेब केतकर व कै. डॉ. अण्णासाहेब खैर यांच्या प्रतिमेचे पूजन कार्यक्रमाचे अध्यक्ष कुलसचिव श्री. अमोल जोशी यांनी केले.

विद्यालयाचे माजी विद्यार्थी असलेले विद्यालयाचे उपशिक्षक श्री. लक्ष्मण चव्हाण यांनी विद्यालयाच्या स्थापनेपासूनच्या इतिहासाचा मागोवा घेताना विद्यालयामुळे झालेल्या तळेगावच्या पंचक्रोशीतील शैक्षणिक प्रगती व इ. १२वी पर्यंत शिक्षण उपलब्ध झाल्यामुळे मुलींच्या बालविवाह या प्रथेस कसा पायबंद झाला हे आपल्या मनोगतातून मूद केले.

प्रमुख पाहुणे नेरूळ शाखेचे माजी मुख्याध्यापक श्री. शिवाजी माळी यांनी त्यांचे विद्यालयात उपशिक्षक पदावर कार्यरत असतानाचे काही अनुभव कथन केले.

विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. अशोक ढिवरे यांनी विद्यालयाच्या भौतिक विकासासोबतच गुणवत्ता विकासही व्हावा ही अपेक्षा मनोगतातून व्यक्त केली.

कुलसचिव श्री. अमोल जोशी यांनी कुलगुरु कै. दादासाहेब केतकर व संवर्धक कै. अण्णासाहेब खैर यांच्या त्यागपूर्ण कार्याचा आढावा घेताना नाशिक शाखेसाठी हक्काची जागा मिळवण्यासाठी कै. अण्णासाहेब खैर यांनी केलेले प्रयत्न विशद केले. तळेगाव शाखेच्या विकासासाठी लाभत असलेल्या सर्व संचालक मंडळाच्या सहकार्याचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला. इ. १२वी च्या उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे अभिनंदन केले. तसेच विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासासाठी अधिक प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. संजय जोशी यांनी, सूत्रसंचालन श्रीमती प्रिती राजपूत यांनी व आभार श्री. साहेबराव ठोंबरे यांनी मानले.

### प्रवेशोत्सव :

दि. १५-६-२०२२ रोजी शैक्षणिक सत्राची सुरुवात झाली. सर्व विद्यार्थ्यांचे चॉकलेट व गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. समग्र शिक्षा अभियानाची मोफत पाठ्यपुस्तके प्रातिनिधिक स्वरूपात मुख्याध्यापकांच्या हस्ते वाटप करण्यात आली.

### कै. डॉ. अण्णासाहेब खैर जयंती कार्यक्रम :

विद्यालयात कै. अण्णासाहेब खैर जयंती साजरी करण्यात आली. विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. अशोक ढिवरे यांनी प्रतिमा पूजन केले. उपशिक्षक श्री. भिमराव अडसूळ यांनी कै. अण्णासाहेब खैर यांच्या जीवनकार्याची माहिती सांगितली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रीती राजपूत यांनी व आभार श्री. राजेंद्र जगताप यांनी मानले.

### एस. एस. सी. निकाल :

मार्च २०२२ परीक्षेस (एस.एस.सी.) एकूण १५६ विद्यार्थी प्रविष्ठ झाले. त्यापैकी १४१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. शेकडा निकाल ९०.३८% लागला.

| | | |
|---|---|---|
| १) जया बहिरू ढोन्नर | ८३.२०% | प्रथम क्रमांक |
| २) कृष्णा दशरथ दाते | ८३.२०% | प्रथम क्रमांक |
| ३) सारिका नितिन सद्गीर | ८२.६०% | द्वितीय क्रमांक |

### एच. एस. सी. निकाल :

मार्च २०२२ एच. एस. सी. परीक्षेस विद्यालयाचे एकूण १५३ विद्यार्थी प्रविष्ठ झाले. त्यापैकी १४७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. शेकडा निकाल ९६.०७% लागला.

| | | |
|---|---|---|
| १) कु. कोमल खांडबहाले | ७३.६६% | प्रथम क्रमांक |
| २) कु. निकिता भगत | ७३.५०% | द्वितीय क्रमांक |

**स्पर्धा :**

पंचायत समिती नाशिक तर्फे 'बेटी बचाव बेटी पढाओ' अंतर्गत विद्यालयात विद्यार्थिनींसाठी घोषवाक्ये, निबंध व चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. स्पर्धांचे नियोजन समिती प्रमुख सौ. सुषमा अमृतकर यांनी केले.

**वस्तूरूप देणगी :**

१) श्री. विजय सोनवणे, श्री. संजीव सोनवणे, सौ. भारती गरुड यांचेकडून ६ गणवेश भेट.
२) श्री. सतिश मालपाठक यांचेकडून २ गणवेश भेट
३) श्रीमती मनिषा सोनवणे, श्रीमती दुर्गा सोनवणे यांचेकडून रु. २०००/- ची गोष्टींची पुस्तके ग्रंथालयास भेट मिळाली. ***

## विद्याभवन हायस्कूल(सेमी इंग्रजी) व कनिष्ठ महाविद्यालय,

### नेरूळ,नवी मुंबई शाखा

**संचालक : श्री. दिनेश मिसाळ**
**संचालक : श्री. राजेंद्र बोऱ्हाडे**
**प्र. मुख्याध्यापिका : सौ. राजकुमारी इंदलकर**

**एच एस सी परीक्षेत विद्याभवनचे उज्ज्वल यश:-**

मार्च २०२२ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक शालान्त परीक्षेत नेरुळ येथील विद्याभवन शैक्षणिक संकुलातील ज्युनियर कॉलेज विभागाचे १००% विद्यार्थी उत्तीर्ण झाले. उच्च माध्यमिक शालान्त परीक्षेचा निकाल ऑनलाईन पद्धतीने जाहीर झाला. विद्याभवनाच्या विज्ञान व वाणिज्य या दोन्ही शाखांचा निकाल प्रथमच शंभर टक्के लागला.

विज्ञान विभागातून कु. अमेय राजेंद्र सुरवसे ८७% गुण मिळवून प्रथम तर कु. आर्यन चंद्रशेखर यादव व कु. वेदांगी भूषण शास्त्रकार यांनी अनुक्रमे ८६.१७% व ८१.००% मिळवून द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविला. वाणिज्य विभागातून कु. सीमा रामसिंग खरवड ही विद्यार्थीनी ८८.८३% गुण मिळवून प्रथम तर कु. अंश कुमार सिंग व कु. स्नेहा भीमराव कांबळे यांनी अनुक्रमे ८३.८३% व ८१.३३% मिळवून द्वितीय व तृतीय क्रमांक पटकविला. एकूण १३० विद्यार्थ्यांपैकी १६ विद्यार्थ्यांनी उच्च प्राविण्य, ९० विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी तर २४ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले.

पुणे विद्यार्थी गृहाचे कार्याध्यक्ष श्री. सुनिल रेडेकर, माजी कार्याध्यक्ष प्रा. कृ. ना. शिरकांडे, संचालक श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, श्री. दिनेश मिसाळ, प्र. मुख्याध्यापिका श्रीमती राजकुमारी इंदलकर, श्रीमती सुवर्णा मिसाळ, श्रीमती श्रीजा नायर, श्रीमती मनिषा मुळीक, प्रा. सुजय वाबळे माजी मुख्याध्यापक श्री. शिवाजी माळी तसेच सर्व शिक्षक आणि पालकांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. व भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## विद्याभवन प्राथमिक इंग्रजी शाळा

### नेरूळ,नवी मुंबई शाखा

**संचालक : श्री. दिनेश मिसाळ**
**संचालक : श्री. राजेंद्र बोऱ्हाडे**
**प्र. मुख्याध्यापिका : सौ. मनीषा मुळीक**

**प्रवेशोत्सव :-**

दि. १५ जून २०२२ रोजी प्राथमिक इंग्रजी विभागाचा विद्यार्थी प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. गणेशपूजन व सरस्वती पूजनाने या शैक्षणिक वर्षाचा शुभारंभ झाला. शाळेच्या प्रवेशद्वारावर स्वागत कमान व फुग्यांची कमान लावण्यात आली होती. विद्यार्थ्यांचे औक्षण करण्यात आले. तसेच स्वागत गीत लावून विद्यार्थ्यांचे स्वागत केले. या प्रसंगी सस्थेचे संचालक श्री. दिनेश मिसाळ, मुख्या. श्रीमती मनिषा मुळीक, मुख्या. श्रीमती श्रीजा नायर, शिक्षकवृंद या सर्वांनी विद्यार्थ्यांना चॉकलेट देऊन त्यांचे स्वागत केले.

# विद्याभवन प्राथमिक मराठी शाळा

## नेरूळ,नवी मुंबई शाखा

**संचालक : श्री. दिनेश मिसाळ**

**संचालक : श्री. राजेंद्र बोऱ्हाडे**

**प्र. मुख्याध्यापिका : सौ. सुवर्णा दिनेश मिसाळ**

**प्रवेशोत्सव :-**

दि. १५ जून २०२२ रोजी विद्याभवन प्राथमिक मराठी विभागाचा प्रवेशोत्सव मोठ्या आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी स्वागतकमान तसेच रंगीबेरंगी फुग्यांची कमान उभारण्यात आली होती. प्रवेशोत्सवावेळी संस्थेचे संचालक श्री. दिनेश मिसाळ व मुख्याध्यापिका सौ. सुवर्णा दिनेश मिसाळ तसेच सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे स्वागत औक्षण करुन व चॉकलेट देऊन केले. सर्वांना नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. आनंदी वातावरणात सुमधूर स्वागत गीतांनी विद्यार्थ्यांचे उत्साहात व आनंदात स्वागत केले.

**गुरुवर्य डॉ. अण्णासाहेब खैर यांची १२४ वी जयंती:**

दि. १५ जून २०२२ रोजी विद्याभवन नेरुळ शाखेने गुरुवर्य डॉ. अण्णासाहेब खैर यांची १२४ वी जयंती उत्साहाने साजरी केली. या कार्यक्रमाप्रसंगी उत्कर्ष महिला मंडळाच्या अध्यक्ष श्रीमती रेखा वाळवेकर श्रीमती अपर्णा दाबके, श्रीमती स्वाती पालकर, श्रीमती स्वाती फडके संस्थेचे संचालक श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ, प्रभारी मुख्याध्यापिका श्रीमती राजकुमारी इंदलकर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते गुरुवर्य डॉ. अण्णासाहेब खैर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर प्राथमिक विभागाची विद्यार्थिनी कु. वेदिका खोत व शिक्षक श्री. शशिकांत पुजारी यांनी अण्णासाहेबांचे सदविचार विविध उदाहरणांसह आपल्या भाषणातून मांडले. उत्कर्ष महिला मंडळाच्या अध्यक्ष श्रीमती रेखा वाळवेकर यांनी आपले विचार मांडताना डॉ. किंजवडेकरांच्या आठवणींना उजाळा दिला. डॉ. किंजवडेकर यांनी मुंबई येथे दोन शाळा निर्माण करुन माजी विद्यार्थी मंडळाची स्थापना केली. डॉक्टर नेहमी सहकाऱ्यांना घेऊन कार्यक्रम करायचे. पुणे विद्यार्थी गृह ही ११३ वर्षाची शैक्षणिक व सामाजिक वारसा लाभलेली संस्था असून येथे विद्यार्थ्यांना संस्कारक्षम शिक्षण दिले जाते, असे त्या म्हणाल्या. संस्थेचे संचालक श्री. दिनेश मिसाळ यांनी डॉ. अण्णासाहेब खैरांच्या स्वभावाचे विविध पैलू व त्यांचे कार्य स्पष्ट केले. तसेच शिक्षणाविषयी असलेली अण्णांची धडपड गरीब व गरजू विद्यार्थ्यांना त्यांनी कशाप्रकारे शिक्षणप्रवाहात आणले याविषयीची माहिती दिली आपल्या परिस्थितीवर कशी मात करावी हे अण्णांच्या उदाहरणावरुन सांगितले. सर्व विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा दिल्या.

शाळेतील विद्यार्थ्यांना संचालक श्री. दिनेश मिसाळ व मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ, प्रभारी मुख्याध्यापिका श्रीमती राजकुमारी इंदलकर यांच्या शुभहस्ते मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. श्रीमती नूतन गवांदे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

# विद्याभवन पूर्व प्राथमिक इंग्रजी शाळा

## नेरूळ,नवी मुंबई शाखा

**संचालक : श्री. दिनेश मिसाळ**

**संचालक : श्री. राजेंद्र बोऱ्हाडे**

**पर्यवेक्षक : सौ. अस्मिता सलगर**

**प्रवेशोत्सव :-**

दि. ०९ जून २०२२ रोजी पुणे विद्यार्थी गृह विद्याभवन नेरुळ येथे पूर्व प्राथमिक इंग्रजी विभागातर्फे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ चा विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव मोठ्या आनंदात व उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी शाळेमध्ये ठिकठिकाणी फुगे, कार्टुन्स चित्र लावून छानपैकी सजावट करण्यात आली होती. विद्यार्थ्यांना चॉकलेट देत शिक्षिकांनी त्यांचे स्वागत केले. या प्रसंगी संस्थेचे संचालक श्री. दिनेश मिसाळ व मुख्याध्यापिका सौ. श्रीजा नायर उपस्थित होत्या.

संचालक श्री. दिनेश मिसाळ यांच्या हस्ते श्री. गणेशपूजन व सरस्वतीपूजन करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांचे स्वागत करीत त्यांना पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

चिमुकले विद्यार्थी फार उत्साही दिसत होते. शाळेत आल्याचा त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद तर अवर्णनीय होता. श्री. मिसाळ यांनी विद्यार्थ्यांना त्यांचे कलागुण सादर करण्याची संधी दिली. कुणी गाणे तर कुणी कविता छान प्रकारे सादर केल्या. या दिवशी विद्यार्थ्यांना बुस्ट एनर्जी ड्रिंकचे पेय देण्यात आले.

## विद्याभवन माध्यमिक इंग्रजी शाळा

### नेरूळ,नवी मुंबई शाखा

**संचालक : श्री. दिनेश मिसाळ**

**संचालक : श्री. राजेंद्र बोऱ्हाडे**

**प्र. मुख्याध्यापिका : सौ. श्रीजा नायर**

**प्रवेशोत्सव :-**

दि. १५ जून २०२२ रोजी माध्यमिक इंग्रजी विभागाचा प्रवेशात्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी स्वागत कमान, स्वागतगीत, रंगीबेरंगी फुग्यांची कमान लावण्यात आली. संचालक श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका सौ. श्रीजा नायर व शिक्षकवृंद या सर्वांनी विद्यार्थ्यांचे औक्षण करुन चॉकलेट देऊन सुमधूर संगीताने त्यांचे स्वागत केले. तसेच नवीन शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी शुभेच्छा दिल्या.

**गुरुवर्य डॉ. अण्णासाहेब खेर जयंती :-**

दि. १५ जून २०२२ रोजी गीतामहर्षी गुरुवर्य अण्णासाहेब खेर यांची १२४ वी जयंती श्रध्दापूर्वक साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाप्रसंगी संचालक श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका सौ. श्रीजा नायर, मुख्याध्यापिका सौ. मनिषा मुळीक उपस्थित होते. संचालक श्री. दिनेश मिसाळ यांच्या शुभहस्ते गुरुवर्य अण्णासाहेब खेर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर प्राथमिक व माध्यमिक विभागाच्या शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी अण्णासाहेबांचे विचार व त्यांचा जीवन परिचय करुन दिला. संचालक श्री. दिनेश मिसाळ यांनी अण्णासाहेबांचे विविध गुण व विचार सांगून अण्णासाहेबांचे विचार प्रत्यक्ष आचरणात आणावे याविषयी मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्री. जगन्नाथ कोळी यांनी केले.

**१० वी चा निकाल :-**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे आयोजित मार्च २०२२ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत माध्यमिक इंग्रजी विभागाचे एकूण १०० विद्यार्थी बसले होते. त्यापैकी १५ विद्यार्थ्यांना ९०% पेक्षा जास्त गुण प्राप्त झाले. **नेरुळ शाखेच्या निकालाची परंपरा कायम राखत विभागाचा निकाल १००% लागला. गेली १९ वर्षे१००% निकालाची परंपरा जपली आहे.**

परीक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांपैकी ७१ विद्यार्थी विशेष्य प्राविण्य, २९ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. प्रथम आलेल्या तीन विद्यार्थ्यांची नावे खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | विद्यार्थ्यांची नावे | टक्के | क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | कु. प्राची प्रल्हाद सागवेकर | ९६.४०% | प्रथम |
| २. | कु. प्रिया प्रकाश राऊत | ९६.२०% | द्वितीय |
| ३. | कु. अंशुल राजेश गुप्ता | ९४.६०% | तृतीय |

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या व शाळेच्यावतीने हार्दिक अभिनंदन!**

**वर्धापन दिन :-**

दि. १८ जून २०२२ रोजी नेरुळ येथील विद्याभवन शाळेचा २१ वा वर्धापन दिन जल्लोषात साजरा करण्यात आला. वर्धापनदिनाचे औचित्य साधून सत्यनारायण पुजेचे आयोजन करण्यात आले होते. कार्याध्यक्ष श्री. सुनिल रेडेकर व सौ. वर्षा रेडेकर यांच्या हस्ते सत्यनारायण पूजा करण्यात आली होती.

कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख अतिर्थींच्या हस्ते श्रींच्या मूर्ती पूजनाने तसेच कुलगुरू दादासाहेब केतकर, गुरुवर्य अण्णासाहेब खैर, स्व. डॉ. शं पां. किंजवडेकर यांच्या

प्रतिमेचे पूजन करुन दीपप्रज्वलाने करण्यात आली. विद्यार्थिनींनी स्वागत गीत सादर केले. त्यानंतर श्रीमती शितल येणगे व श्री. सुहास राऊळ यांनी शाळेच्या स्थापनेपासून आतापर्यंत शाळेचा आलेख कसा उंच उंच होत गेला, तसेच विद्याभवन संकुलाच्या उज्वल कामगिरीचा आराखडा पॉवर पॉईन्टद्वारे सादर केला.

कार्याध्यक्ष श्री. सुनिल रेडेकर यांच्या शुभहस्ते प्रमुख अतिथी माजी कार्याध्यक्ष प्रा. कृ. ना. शिरकांडे यांचा शाल, श्रीफळ, रोप व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. तसेच व्यासपीठावरील इतर मान्यवरांचाही सत्कार श्रीफळ व रोप देऊन करण्यात आला. प्रमुख अतिथी व व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते दहावी आणि बारावीच्या परीक्षेत आलेल्या प्रथम तीन विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. कु. श्रुती कुलकर्णी या विद्यार्थिनींने राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात केलेल्या कामगिरीसाठी तिचा सत्कार करण्यात आला.

**संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. सुनिल रेडेकर यांनी विद्याभवन संकुलाच्या २१ वर्षाच्या कामगिरीची प्रशंसा केली. तसेच एक आदर्श विद्यार्थी व आदर्श नागरिक घडविण्याच्या संकुलाच्या परंपरेचे कौतुकही केले. तसेच आयुर्वेदगौरव स्व. डॉ. शं. पां. किंजवडेकर आणि संस्थेचे माजी कार्याध्यक्ष प्रा. कृ. ना. शिरकांडे यांच्या परिश्रमातूनच नेरुळ शाखेची मुर्हत मेढ रोवली गेली, असे मत व्यक्त केले.**

**आंतरशालेय योगदिन :-**

दि. २१ जून २०२२ रोजी विद्याभवन संकुलात ८ वा आंतरराष्ट्रीय योगदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. योगदिनाचे औचित्य साधून नवी मुंबई महानगरपालिका, सिडको व आर्ट ऑफ लिव्हिंग यांच्या संयुक्त विद्यमाने सिडको एक्झिबिशन सेन्टर वाशी, येथे विद्याभवन संकुल नेरुळ येथील २० योगाभ्यासकांनी सहभाग नोंदविला. या प्रसंगी नवी मुंबई महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त श्रीमती सुजाता ढोले, उपायुक्त श्री. जयदीप पवार, श्री. दादासाहेब चाबुकस्वार, श्री. जाधव अनंत तसेच अन्य पदाधिकारी यांनी आपल्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले. त्यांच्या समवेत योगासने, प्राणायम व ध्यानधारणा केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. संकेत थळे तर आभारप्रदर्शन श्री. सुहास राऊळ यांनी केले.

**शैक्षणिक सहल :-**

बुधवार दि. २२ जून २०२२ रोजी महाराष्ट्र टाइम्स तर्फे ६१ व्या वर्धापन दिनानिमित्त शाळेतील मुलांसाठी शैक्षणिक सहलीचे आयोजन वरळी येथील नेहरु तारांगण येथे करण्यात आले होते. या सहलीमध्ये माध्यमिक इंग्रजी विभागाच्या ५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

## विद्याभवन हायस्कूल पूर्व प्राथमिक सेमी इंग्रजी शाळा

### नेरूळ,नवी मुंबई शाखा

**संचालक : श्री. दिनेश मिसाळ**
**संचालक : श्री. राजेंद्र बोऱ्हाडे**
**प्र. मुख्याध्यापिका : सौ. सुवर्णा दिनेश मिसाळ**

**प्रवेशोत्सव :-**

पूर्व प्राथमिक सेमी इंग्रजी विभागाने दि. ०९ जून २०२२ रोजी इयत्ता नर्सरी व छोटा शिशु वर्गाचा जल्लोषात प्रवेशोत्सव साजरा केला. या दिवशी विद्यार्थ्यांचे औक्षण करुन व चॉकलेट देऊन स्वागत केले. तसेच कार्डपेपरवर स्माईली फेस बनवून विद्यार्थ्यांना देण्यात आले. कोरोना वैश्विक महामारी नंतर प्रथमच नविन विद्यार्थ्यांचे शाळेत आगमन झाले. त्यांना आनंदी, प्रसन्न वातावरण मिळावे यासाठी आपल्या शालेय सभागृहामध्ये छान बडबडगीते गाणी लावण्यात आली होती.

पूर्व प्राथमिक सेमी इंग्रजी विभागाने दि. १५ जून २०२२ रोजी इयत्ता मोठा शिशु वर्गाचा प्रवेशोत्सव साजरा केला. या कार्यक्रमाप्रसंगी उत्कर्षा ज्येष्ठ महिला मंडळाच्या सदस्या सौ. रेखा वाळवेकर, सौ. अपर्णा दाबके, सौ. स्वाती पालकर, सौ. स्वाती फडके उपस्थित होत्या. त्यांना विद्यार्थ्यांनी उपक्रमाअंतर्गत कार्डपेपरद्वारे बनविण्यात आलेले स्माईली फेस (हसरे चेहेरे) पाहुण्यांना देण्यात आले. तसेच नेरुळचे माजी नगरसेवक श्री. काशिनाथ पवार व नवी मुंबई शहर प्रमुख श्री. विजय माने व शाळेचे

संचालक श्री. दिनेश मिसाळ यांनी वर्गामध्ये येऊन विद्यार्थ्यांचे स्वागत केले. विद्यार्थ्यांना चॉकलेट देऊन शैक्षणिक नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या.

**योगा डे :-**

पूर्व प्राथमिक सेमी इंग्रजी विभागाने दि. २१ जून २०२२ रोजी जागतिक योग दिवस साजरा केला. या कार्यक्रमात सर्व विद्यार्थ्यांचे शालेय सभागृहात शिक्षकांबरोबर योगासनाचे प्रात्यक्षिक करुन घेतले. तसेच एकाग्रता वाढविण्यासाठी विद्यार्थ्यांकडून ध्यान धारना व ओंकार गुंजन करुन घेतले. दररोज असे सकाळी नित्यनेमाने सराव करा असे सांगितले.

## नेरुळ शाखा – नवी मुंबई

### देणगीदारांची यादी

**श्री. सुरेश जयराम पवार,** नेरुळ (प), यांनी दि. ०९.०६.२०२२ रोजी नेरुळ शाखावाढीसाठी रु. ५०००/- देणगी दिली आहे.

**श्री. सदानंद नारायण साळुंखे,** ठाणे यांनी दि. ०८.०६.२०२२ रोजी मेहुणे कै. अमरसिंह राणे यांच्या स्मरणार्थ नेरुळ शाखा वाढीसाठी रु. ५५५/- देणगी दिली आहे.



विद्यार्थ्यांचे चॉकलेट देऊन स्वागत करताना संचालक श्री. दिनेश मिसाळ, सोबत मुख्याध्यापिका श्रीमती श्रीजा नायर आणि शिक्षक.



विद्यार्थ्यांचे औक्षण करताना मुख्याध्यापक आणि शिक्षकवृंद सोबत संचालक श्री. दिनेश मिसाळ



पर्यवेक्षिका सौ. अस्मिता सलगर विद्यार्थ्यांना योगाची प्रात्यक्षिके करुन दाखवितांना

## विद्याभवन नेरूळ,नवी मुंबई शाखा शालांत परीक्षा २०२१-२२ मधील गुणवत्ता यादीतील विद्यार्थी


कु. प्राची सागवेकर
९६.४०%, प्रथम क्रमांक


कु. प्रिया राऊत
९६.२०%, द्वितीय क्रमांक


कु. अंशुल गुप्ता
९४.६०%, तृतीय क्रमांक


कु. दिक्षा सरवणकर
९३.४०%


कु. प्रिती ठाकरे
९३.००%


कु. स्वरा फडतरे
९३.००%


कु. अश्विन कदम
९३.००%


कु. श्रेया वाबळे
९२.६०%


कु. शालु सिंग
९२.१०%


कु. सृष्टी चव्हाण
९२.००%


कु. श्रेया भेके
९१.८०%


कु. रश्मी वारे
९०.६०%


कु. मंजु चौधरी
९०.६०%


कु. यश कचरे
९०.२०%


कु. आदित्य पांडव
९०.००%

## विद्याभवन नेरूळ,नवी मुंबई शाखा इ. १२वी २०२१-२२ मधील गुणवत्ता यादीतील विद्यार्थी

### विज्ञान शाखा


कु. अमेय सुरवसे
८७.००%, प्रथम क्रमांक


कु. आर्यन यादव
८६.१७%, द्वितीय क्रमांक


कु. वेदांगी शास्त्रकार
८१.००%, तृतीय क्रमांक

### वाणिज्य शाखा


कु. सीमा खरवड
८८.८३%, प्रथम क्रमांक


कु. अंशकुमार सिंग
८३.८३%, द्वितीय क्रमांक


कु. स्नेहा कांबळे
८१.३३%, तृतीय क्रमांक

# डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल,म्हसरूळ–नाशिक

## माध्यमिक व उच्च माध्यमिक विभाग

**संचालक : श्री. संजय गुंजाळ**

**मुख्याध्यापिका : श्रीमती भारती पाटील**

### १७-६-२०२२ डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश मिडियम मधील विद्यार्थ्यांची एस.एस.सी. परीक्षेत उत्तुंग भरारी


कु. समर्थ बिडकर
९५.४०%


कु. सृष्टी निरगुडे
९३.२०%


कु. अभिषेक बोडके
९१.४०%

राज्य माध्यमिक मंडळाचा इयत्ता दहावी बोर्डाचा निकाल शुक्रवारी जाहीर झाला. डॉ. काकासाहेब देवधर शाळेचे विद्यार्थी सातत्याने उत्कृष्ट निकाल मिळवत आले असून यंदाही ही परंपरा कायम राखत दहावी बोर्डाचा निकाल १०० टक्के लागला आहे.

